शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्परिषद नियतकालिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Refereed Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता क्र. ([illegible]))

वर्ष सहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१


'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

**पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव**

• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन [illegible] •

ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे [illegible] त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Refereed Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

● संपादक ●

प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

● अतिथी संपादक ●

डॉ. मिलिंद हुजरे

प्राचार्य, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली

डॉ. तातोबा बदामे　　　　डॉ. शहाजी पाटील

● कार्यकारी संपादक ●

डॉ. नीला जोशी

● संपादक मंडळ ●

प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे　　डॉ. गोमटेश्वर पाटील　　डॉ. तातोबा बदमे　　डॉ. दिनेश वाघुंबरे

● सल्लागार समिती ●

डॉ. राजन गवस　　डॉ. प्रकाश कुंभार　　डॉ. डी. ए. देसाई　　डॉ. अनिल गवळी

● प्रकाशक ●

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

मुद्रक

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

मूल्य: ₹ ३००

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रतिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

प्रभारी प्राचार्य

[illegible], वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

[illegible] जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| मराठी दळणगीतातील सामाजिक-नैतिक मूल्याविष्कार | डॉ. माधव सूर्यवंशी | ४०९ |
| पोतराजांचे विधिनाट्य आणि पोतराजाची गीते | डॉ.शरद गायकवाड | ४१३ |
| संत एकनाथांच्या भारुडांतून व्यक्त झालेली लोक संस्कृती | डॉ.आनंद घारगे | ४१७ |
| आदिवासी भिल्लांच्या बोलीभाषिक लोककथा | डॉ. दीपककुमार वळवी | ४२० |
| लोकसंस्कृतीचा प्रयोगरूप आविष्कार: गोंधळ | माणिक नामदेव बनकर | ४२४ |
| लोकसाहित्य – संकल्पना, स्वरुप व व्याप्ती एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ४२८ |
| लोकसाहित्य प्रयोग आविष्कार : तमाशा | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ४३१ |
| लोकसंस्कृतीतील स्त्रियांची समृद्ध लोकगीतगंगा | दादासाहेब ईश्वर गायकवाड | ४३५ |
| लोकसाहित्याचे संशोधन : स्वरूप व व्याप्ती | डॉ. डी. आर. गायकवाड | ४३९ |
| लोक नाट्य तमाशा : लोकल ते ग्लोबल | गुंडोपंत पाटील | ४४३ |
| तमाशा कलावंतांचे सामाजिक जीवन आणि संस्कृती | डॉ. सुनील चंदनशिवे | ४४८ |
| लोकसंस्कृतीचे उपासक-वाघ्या-मुरळी | डॉ.प्रशांत गायकवाड | ४५१ |
| तमाशाचे बदलते स्वरूप | डॉ. नितीश पांडूरंग सावंत | ४५५ |
| लोकसाहित्य एक कला प्रकार : उखाणा | डॉ. शर्मिला घाटगे | ४५९ |
| लोककथेची निवेदन तंत्रे | डॉ. सुरेश बा. शिंदे | ४६२ |


प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



ISSN No. 2319-6025

# लोकसाहित्यातील एक कलाप्रकार : उखाणा

**डॉ. शर्मिला घाटगे**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

'उखाणा' म्हणजेच कोड्यातून, कुटप्रश्नातून, कथनातून व काव्यात्म पदबंधातून चटकदार भाषा तसेच खेळकरपणे आपले म्हणणे मांडण्याचा लोकवाङ्मयातील अभिव्यक्ती प्रकार. भारतात 'उखाणा' या शब्दाला अनेक पर्यायी शब्द वापरले जातात. कूट, प्रहेलिका, कोडे, प्रश्न, बह्लोद्य, आयना, कोहाळा असे शब्द उखाणा या प्रकारासाठी उपयोगात आणले जातात. त्याला संस्कृतमध्ये प्रहेलिका आणि हिंदीत पहेली असेही म्हणतात. कोडे किंवा कुटप्रश्न हा उखाण्याचा आणखी एक अर्थ आहे. महाराष्ट्रातील वारली आणि आगरी जमातीत उखाण्यांना 'कलगुंडे' असे म्हणतात. दुर्गा भागवत यांनी महाभारतातील छोटा नागपूर प्रदेशातील खारियात उखाण्यांसाठी 'बुझबुझावली' असा शब्द प्रचलित असल्याचे सांगितले आहे. कर्नाटक राज्यामध्ये उखाण्यासाठी ओडकथू, ओडगते तसेच आंध्रप्रदेशात विडीकथ हे शब्द प्रचलित आहेत. यावरुन उखाण्यांचे स्वरुप हे कथनात्म असल्याचेही लक्षात येते.

उखाण्याचे स्वरुप विविधतेने नटलेले आहे. उखाण्याच्या विविध घडणी आकर्षक असून अर्थपूर्ण आहेत. पुरुष वर्गात कोडी तर स्त्रियांत उखाणे प्रचलित आहेत. उखाण्याचा वापर केव्हा व कोणत्या प्रसंगी करावा याबद्दल दुर्गा भागवत म्हणतात, ''ज्यावेळी गावाचे, जमातीचे किंवा घराण्यांचे भवितव्य धारेवर धरलेले असते त्यावेळी उखाण्यांचा वापर करावयाचा असतो. पावसाचे आवाहन, धान्याची लावणी, सुंता, शिकार, लग्न आणि मार्मिक वगैरे प्रसंगी उखाण्याचा वापर होणे साहजिकच आहे''[१]. लोकसाहित्यातील 'उखाणा' हा एक कलाप्रकार आहे. तसेच तो भाषिक क्रीडाप्रकारही आहे. असे अनेक अभ्यासकांनी मान्य केले आहे. 'उखाणा' या शब्दाचा कोशागत अर्थ पुढीलप्रमाणे आहे. ''उखाणा म्हणजे गुढ अर्थाचे वचन, कूट प्रश्न, म्हण, रिडल''[२]

तसेच हा अर्थ अधिक स्पष्ट करुन सांगताना डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात, ''उखाणे म्हणजे कोडं, कूट प्रश्न, म्हण, उक्ती, वचन, अलंकार यमकयुक्त वाक्यरचना असाही अर्थ लागतो.''[३] या सर्व स्पष्टीकरणानंतर उखाणा हा कलाप्रकार गूढ अर्थाने भरलेला असतो. तो अर्थ समोरच्या माणसांनी स्पष्ट करावयाचा आहे. उखाणा या शब्दाचा अर्थ म्हणजे 'लग्नात वधुने आणि वराने परस्परांचे नाव घेणे म्हणजे उखाणा' हाच अर्थ समाजात सर्वमान्य झालेला आहे असे असले तरी उखाणा या शब्दाला अजून काही अर्थ, छटा आहेत. उखाण्यास 'अहाणा', 'हुमान' आणि प्रहेलिका असेही म्हटले जाते. तरीही प्रत्येक शब्दाच्या अर्थछटा वेगळ्या असून त्यास वेगवेगळे अर्थ प्राप्त झालेले आहेत.

**उखाण्यांचे प्रकार :**

उखाणा या प्रकारात विविधता दिसून येते. त्यामध्ये वेगवेगळे प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे

प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



ISSN No. 2319-6025

**मनोरंजनात्मक उखाणे :**

केवळ मनोरंजनाच्या हेतूने अस्तित्वात आलेला उखाण्याचा हा प्रकार आहे. या उखाण्याचे स्वरुप कोड्यासारखे आहे. अत्यंत सुटसुटीत व मोजक्या शब्दांत हा उखाणा असतो. मोजके व समर्पक शब्द हे या उखाण्यांचे एक वैशिष्ट्य आहे.

उदा.    जेवणात जी – करंजी
        पाच घर – पवा
        दुधावरचा फेस – लोणी
        वैरणात बा – कडबा

उखाण्याचा वापर याच प्रसंगी करण्यात येतो असे नाही. लग्नप्रसंगी व मर्तिकाचे वेळी उपयोगात आणल्या जाणाऱ्या उखाण्यांचा अपवाद सोडता बाकी उखाणे केव्हाही उपयोगात आणले जातात. चार चौघे पुरुष मंडळी, स्त्रिया एकत्रित आल्या की, उखाण्यांला सुरुवात होते. डॉ. कमलाबाई देशपांडे उखाण्याला अपौरुपेच वाङ्मयातील अनुष्टुप छंद म्हणतात. ते योग्यच वाटते. उखाणा सादर करणाच्या पद्धतीत समतत्त्व व संवादित्व ही दोन सौंदर्यतत्त्वे असतात. त्यामुळेच उखाणा हा सौंदर्यपुर्ण व वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

**समारोप :**

'उखाणा' हा एक लोकसाहित्यातील प्रकार असून त्यामधून स्त्रियांच्या मनाचा, भावनेचा अविष्कार प्रकट होतो. उखाण्यामधून समाजस्थितीचे व संस्कृतीचे दर्शन घडते. उखाण्यांमधून देव-देवता, सण-समारंभ, व्यक्ती-व्यक्तीमधले नातेसंबंध परस्परांबद्दल आपुलकी, स्नेहभाव, प्रेम या गोष्टी प्रकट होत असतात. या उखाण्यांच्या अभ्यासातुन तत्कालीन समाजातील संस्कृती, भाषा, सण, उत्सव यासारख्या गोष्टीचे चित्रण पहावयास मिळते. एकूणच लोकसाहित्याच्या अभ्यासामध्ये उखाण्यांचे सांस्कृतिक योगदान फार महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**


६. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा, पृ. २३३.

७. राज्याध्यक्ष विजया (संपा.) : मराठी वाङ्मयकोश, खंड ४ था, समीक्षा, संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें. २००२, पृ. ४५.

८. बाबर सरोजिनी : मराठीतील स्त्रीधन, संचालक, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७३, पृ. १६८.

९. कुंभार ज्योति : लोकसाहित्याचे स्वरुप, सरिता प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १३०.

१०. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा, पृ. २७०.



प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान
गडहिंग्लज, जि. कोल

३. प्रश्नोत्तर स्वरुपाचे उखाणे.

४. प्रश्नविरहीत स्वरुपाचे उखाणे

अ) खेळातील उखाणे

ब) नाव घेण्याचे उखाणे

क) व्याही विहिणीचे उखाणे

ड) कूटात्मक उखाणे

इ) मनोरंजनात्मक उखाणे [४]

अशा स्वरुपांच्या उखाण्यांना साधे उखाणे म्हणतात.

**१) नाव घेण्याचे उखाणे :**

उखाण्यामधून आपापल्या कुटुंबाचे परंपरेचे संस्काराचे वर्णन दिसून येते. अशा उखाण्यातून कौटुंबिक नातीगोती, सणासुदींचे विशेष, घराण्यांची रीत-भात इत्यादींची कलात्मक गुंफण पहावयास मिळते. विविध अलंकार, प्रतिमा यांचा वापर केलेला असतो. अशा प्रकारच्या उखाण्यातून लोकसंस्कृती, लोकमानस आणि समकालीन वास्तवाचे दर्शन घडत असते.

उदा. सोन्याची पाटली, हाताला दाटली
***** रावांचे नाव घेताना खुशाली वाटली
या उखाण्यातून स्त्री जीवनातील अलंकाराचे दर्शन घडते.

**२) व्याही-विहिणीचे उखाणे :**

रुखवताच्या प्रसंगी थट्टा मस्करी करुन हास्याचे तुषार उडविण्याकरिता अशा स्वरुपाचे उखाणे असतात. व्याही-विहिणीच्या संबंधी असे अनेक अश्लील उखाणे आढळतात. अशा स्वरुपाच्या उखाण्यातून रुखवताच्या साहित्याचे, सामाजिक व शारिरीक व्यंगाचे आणि जीवनातील विलंगत प्रसंगाचे वर्णन आढळते.

उदा. मांडवाच्या दारी पडलं टिपरं
विहिणीला पोर झालं झिपरं

**३) खेळातील उखाणे :**

या उखाण्याचा संबंध एखाद्या कोणत्यातरी खेळाशी असतो. महाराष्ट्रात फुगडी किंवा झिम्मा किंवा कोणीही यावे, टिकली मारुन जावे वगैरे खेळ खेळताना उपयोगात आणलेल्या उखाण्यांच्या संदर्भात दुर्गा भागवत म्हणतात, ''मूळचे हे नाचाचे प्रकार विधीशी संलग्न असावेत व त्यानंतर विधी नष्ट झाल्यावर नाच व गीतांची किंवा प्रश्नोत्तर रुप उखाण्याची प्रथा बदलून तिचे परिवर्तन प्रचलित पारंपारिक उखाण्यात झाले असावे.''[५]

उदा. समोर होता कोनाडा, त्यात होता पेडा
मैनीला नाही कळलं, तिचा नवरा होता येडा
नवरा होता येडा, नाई नवरा होता येडा
त्याला आवडे लांड्या शेपटीचा गौडा
अशा प्रकारच्या उखाण्यातून एकमेकांची थट्टा केली जाते.

प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
... जि. कोल्हापूर


ISSN No. 2319-6025

**मनोरंजनात्मक उखाणे :**

केवळ मनोरंजनाच्या हेतूने अस्तित्वात आलेला उखाण्याचा हा प्रकार आहे. या उखाण्याचे स्वरुप कोड्यासारखे आहे. अत्यंत सुटसुटीत व मोजक्या शब्दांत हा उखाणा असतो. मोजके व समर्पक शब्द हे या उखाण्यांचे एक वैशिष्ट्य आहे.

उदा. जेवणात जी – करंजी

पाच घर – पवा

दुधावरचा फेस – लोणी

वैरणात बा – कडबा

उखाण्याचा वापर याच प्रसंगी करण्यात येतो असे नाही. लग्नप्रसंगी व मर्तिकाचे वेळी उपयोगात आणल्या जाणाऱ्या उखाण्यांचा अपवाद सोडता बाकी उखाणे केव्हाही उपयोगात आणले जातात. चार चौघे पुरुष मंडळी, स्त्रिया एकत्रित आल्या की, उखाण्यांना सुरुवात होते. डॉ. कमलाबाई देशपांडे उखाण्याला अपौरुपेच वाङ्मयातील अनुष्टुप छंद म्हणतात. ते योग्यच वाटते. उखाणा सादर करणाच्या पद्धतीत समतत्व व संवादित्व ही दोन सौंदर्यतत्वे असतात. त्यामुळेच उखाणा हा सौंदर्यपुर्ण व वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

**समारोप :**

'उखाणा' हा एक लोकसाहित्यातील प्रकार असून त्यामधून स्त्रियांच्या मनाचा, भावनेचा अविष्कार प्रकट होतो. उखाण्यामधून समाजस्थितीचे व संस्कृतीचे दर्शन घडते. उखाण्यांमधून देव-देवता, सण-समारंभ, व्यक्ती-व्यक्तीमधले नातेसंबंध परस्पराबद्दल आपुलकी, स्नेहभाव, प्रेम या गोष्टी प्रकट होत असतात. या उखाण्यांच्या अभ्यासातुन तत्कालीन समाजातील संस्कृती, भाषा, सण, उत्सव यासारख्या गोष्टीचे चित्रण पहावयास मिळते. एकूणच लोकसाहित्याच्या अभ्यासामध्ये उखाण्यांचे सांस्कृतिक योगदान फार महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

६. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा, पृ. २३३.

७. राज्याध्यक्ष विजया (संपा.) : मराठी वाङ्मयकोश, खंड ४ था, समीक्षा, संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें. २००२, पृ. ४५.

८. बाबर सरोजिनी : मराठीतील स्त्रीधन, संचालक, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७३, पृ. १६८.

९. कुंभार ज्योति : लोकसाहित्याचे स्वरुप, सरिता प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १३०.

१०. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा, पृ. २७०.

प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर